अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 16 ऑक्टोबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 09 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये


# पं.स. सदस्य पदांकरीता आरक्षण सोडत जाहीर

## जिल्हा परिषद गटातून महिला हद्दपार

ब्रम्हपुरी/का.प्र.

ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांच्यातील दुवा म्हणून पंचायत समितीकडे बघितले जाते. गाववाड्यातील मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या पंचायत समिती सदस्य पदासाठी आरक्षणाची सोडत सोमवारला तहसिल कार्यालय, ब्रम्हपुरी येथे काढण्यात आली. यातून 'कहीं खुशी, कहीं गम' असे संमिश्र चित्र पाहायला मिळाले. ब्रम्हपुरी पंचायत समिती सदस्य पदाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात आले. ब्रम्हपुरीच्या उपविभागीय अधिकारी पर्वनी पाटील व तहसीलदार सतिश मासाळ यांच्या उपस्थितीत पुढील २०२५ ते २०३० या पंचवार्षिकसाठी पंचायत समिती सदस्य पदासाठी आरक्षण घोषित करण्यात आले.

आरक्षण सोडत काढताना गावागावांतील अनेक राजकीय पुढारी, इच्छुक मंडळी उपस्थित होती. यात आरक्षणाचा फटका बसल्यामुळे काही जणांच्या पदरी निराशा आली, तर अनुकूल आरक्षणामुळे पंचायत समिती सदस्य पदाची संधी मिळण्याच्या



आशेमुळे बरेच इच्छुक कामाला लागले. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या आणि ब्रम्हपुरी तालुक्यातील बड्या राजकीय नेत्यांशी संबंधित असलेल्या गावांच्या पंचायत समिती गणामध्ये सदस्य पदाच्या आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. यात काही जणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. तर काहीजणांच्या आशेवर पाणी फेरले गेल्याचे दिसून आले.

यापूर्वी ब्रम्हपुरी पंचायत समिती सभापती पदासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली, त्यात सभापती पद हे सर्वसाधारण आहे. पंचायत समितीच्या १० गणांसाठी सदस्य पदाची आरक्षण सोडत सोमवारला काढण्यात आली. यात **नान्होरी** - अनुसूचित जाती (सर्वसाधारण), **अऱ्हेर नवरगाव** - सर्वसाधारण (महिला), **पिंपळगांव** - सर्वसाधारण, **मालडोंगरी** - सर्वसाधारण, **खेडमक्ता** - ना.मा.प्र., **चौगान** - सर्वसाधारण, **गांगलवाडी** - ना.मा.प्र. (महिला), **मेंडकी** - अनुसूचित जमाती (महिला), **आवळगाव** - सर्वसाधारण (महिला), **मूडझा** - सर्वसाधारण (महिला) असे ब्रम्हपुरी पंचायत समितीच्या १०

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## सरन्यायाधीश गवई यांच्यावरील हल्ल्याचा निषेध



ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयात झालेल्या हल्ल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. या संदर्भात विविध आंबेडकरी संघटनांच्या वतीने ब्रम्हपुरी येथे महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्याकडे निवेदन सादर करून, हल्लेखोर वकील राकेश किशोर याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनाद्वारे संघटनांनी म्हटले आहे की, 'हा प्रकार केवळ एका व्यक्तीवरील हल्ला नसून भारतीय न्यायसंस्थेचा, लोकशाहीचा आणि संविधानाचा अपमान आहे. अशा प्रवृत्ती देशाच्या एकात्मतेला आणि सामाजिक समतेला बाधा आणणाऱ्या असून त्यांना कडक शिक्षेने लगाम घालणे आवश्यक आहे.' निवेदन मा. उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी मार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले.

या निवेदनावर अशोक रामटेके, डॉ. युवराज मेश्राम, ॲड. सुभाष मेश्राम, प्रा. आर. बी. मेश्राम, दिनेश लोखंडे, राजू मेश्राम, डी. डी. पाटील, अमरदीप मेश्राम, दिवाकर लोखंडे, दिवाकर चहांदे व जगदीश मेश्राम आदींनी सह्या करून सरन्यायाधिश गवई यांच्यावरील हल्ल्याचा निषेध केला आहे.






## ब्रम्हपुरीत एकाच रात्री २ ठिकाणी घरफोडी

## अवघ्या चार तासात आरोपी अटकेत

ब्रह्मपुरी/का.प्र.

रेल्वे स्टेशन जवळ असलेल्या पेठ वार्ड परिसरात दिनांक १३ ऑक्टोबरच्या रात्री



अज्ञात आरोपीने बंद घराचा दरवाजा तोडून घरातील सोन्याचे दागिने तसेच दुसऱ्याच्या घरातील मोबाईल लंपास केल्याची घटना घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी येथे वेगवेगळे गुन्हे दाखल आले. ब्रम्हपुरी पोलिसांनी सदर घटनेतील आरोपीचा अवघ्या चार तासात शोध घेत आरोपीस बेड्या ठोकल्या.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी धनीराम नकटूची मेश्राम वय ७१ वर्ष रा. पेठवार्ड ब्रह्मपुरी हे दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ ला आपले घराचे दरवाजाला कुलूप लावून बाहेरगावी गेले असताना अज्ञात आरोपीने रात्रीचे वेळेस त्यांचे घराचा दरवाजाचे कुलूप तोडून घरातील कपाटामध्ये असलेले २३०००/- रुपये किंमतीचे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले दागिने तसेच हजार रुपये किंमतीचा नोकिया कंपनीचा कीपॅड मोबाईल असा एकूण २४,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची तक्रार फिर्यादी धनीराम मेश्राम यांनी ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनला दिली. प्राप्त तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४),३०५()

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## संपादकीय...

# योग्य अंमलबजावणी गरजेची

गेल्या आठवड्यात नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्रासाठी 'शेतकरी धनधान्य योजना' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता योजने'ची घोषणा केली. या योजनांचा उल्लेख यंदाच्या केंद्रिय अर्थसंकल्पात करण्यात आला होता. मात्र, आता औपचारिक घोषणा करून या योजनांसाठी तब्बल ३६ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली गेली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि देश कृषी क्षेत्रात आत्मनिर्भर करणे, हा या घोषणेमागे हेतू आहे.

दुसरीकडे महाराष्ट्रात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने आर्थिक पॅकेजची घोषणा केली आहे. ही मदत तुटपुंजी आहे की पुरेशी, हा वेगळा वाद असू शकतो. पण, तरीही दिवाळीच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर बळीराजाच्या पदरी थोडाफार दिलासा देणारी ही सुरुवात आहे.

सरकारकडून जाहीर होणाऱ्या योजनांचा हेतू नेहमीच सकारात्मक असतो. 'शेतकरी धनधान्य योजना' या नावातच शेतकऱ्याच्या समृद्धीची आशा दडलेली आहे. दुसरीकडे 'कडधान्य आत्मनिर्भरता योजना' देशात डाळींच्या उत्पादनात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवते. या योजनांची अंमलबजावणी प्राधान्याने काही निवडक जिल्ह्यात होणार आहे. मात्र, योजना कागदावर न राहता प्रत्यक्ष शेतापर्यंत पोहोचली पाहिजे, हेच या क्षणी सर्वात महत्त्वाचे आहे.

भारत अजूनही मोठ्या प्रमाणात कृषिप्रधान देश आहे. तरीसुद्धा कृषी क्षेत्र पावसावर अवलंबून आहे, ही वस्तुस्थिती लपवता येत नाही. अपुरा पाऊस किंवा अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक नियोजन कोलमडते. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात जाहीर होणाऱ्या आर्थिक पॅकेजपेक्षा दीर्घकालीन उपाययोजना अधिक गरजेच्या आहेत. सिंचन व्यवस्था शंभर टक्के प्रभावी झाली, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध झाले, उत्पादनाला हमीभाव मिळाला तरच त्याच्या हातात खऱ्या अर्थाने समृद्धी येऊ शकते.

पंतप्रधान मोदी यांनी २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे लक्ष्य जाहीर केले होते. मात्र, आज २०२५ मध्येही ते लक्ष्य साध्य झालेले नाही. या अकरा वर्षांत केंद्र सरकारने कृषी क्षेत्रासाठी अनेक योजना जाहीर केल्या. परंतु अंमलबजावणीतील त्रुटी आणि प्रशासकीय विलंबामुळे त्याचा अपेक्षित परिणाम शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला नाही. 'आत्मनिर्भर भारत' हे सरकारचे मुख्य ध्येय असल्यास कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर बनवणे ही सर्वात मोठी जबाबदारी ठरते.

आपण अजूनही मोठ्या प्रमाणावर कडधान्यांसह अनेक कृषी उत्पादनांची आयात करतो. त्यामुळे परकीय चलनाचा ओघ बाहेर जातो. जर देशातच ही उत्पादने मोठ्या प्रमाणावर पिकवली गेली, तर आयात कमी होईल आणि शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यासाठी योजनांची पायाभूत अंमलबजावणी आवश्यक आहे, कागदोपत्री घोषणा नव्हे.

दिवाळीचा सण जवळ आला आहे. या सणात बळीराजाच्या चेहऱ्यावरही आनंदाची लखलख दिसावी, यासाठी केवळ तात्पुरत्या मदतीवर न थांबता योजनांचा ठोस परिणाम जमिनीवर दिसणे गरजेचे आहे. केंद्र आणि राज्य सरकारने घोषणांपेक्षा अंमलबजावणीला प्राधान्य दिल्यासच बळीराजाचे जीवन खऱ्या अर्थाने गोड होईल. योग्य अंमलबजावणी केल्यास अल्पभूधारक शेतकरीही या योजनांनी लाभान्वित होईल, अशा उपाय-योजना करणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रशासनाने पावले उचलावित.

या दोन नव्या योजनांनी कृषी क्षेत्रात नवा आत्मविश्वास निर्माण व्हावा, हीच खरी अपेक्षा आहे. पण या योजना प्रभावी ठरल्या तरच 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचा पाया खऱ्या अर्थाने मजबूत होईल. घोषणांचा उत्सव साजरा करण्याऐवजी अंमलबजावणीचा दीप प्रज्वलित करणे हाच आगामी काळाचा ध्यास हवा.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांची जयंती संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अनुयायी स्व.कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांच्या ११८ व्या जयंतीचा कार्यक्रम नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात नुकताच पार पडला.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर आणि प्राचार्य डॉ. कांबळेंनी फोटोला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर उपस्थित प्रा. मेजर विनोद नरड, डॉ. रेखा मेश्राम, डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ मोहन कापगते, डॉ युवराज मेश्राम, डॉ रतन मेश्राम, डॉ हर्षा कानफाडे, डॉ अरविंद मुंगोले, डॉ किशोर नाकतोडे, डॉ योगेश ठावरी, डॉ अतुल येरपुडे, प्रा. दलेश परशुरामकर, डॉ वर्षा चंदनशिवे, प्रा निलिमा रंगारी, डॉ राजू आदे, डॉ कुलजित शर्मा, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ दर्शना उराडे, प्रा जयंत हजारे, धिरज आतला, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, प्रा प्रफुल्ल पराते, प्रा खोब्रागडे, अधीक्षक संगीता ठाकरे, प्रज्ञा मेश्राम, आलोक मेश्राम, सुषमा राऊत, निनावे, दत्तू भागडकर इत्यादी मान्यवरांनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ युवराज मेश्रामांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ शर्मा, डॉ खानोरकर, प्रा आतला, जगदिश गुरनुले, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

# दक्षिण वनपरिक्षेत्र अंतर्गत वन्यजीव सप्ताह साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

आपला देश जैवविविधतेने नटलेला आहे. या जैवविविधतेतील वन्यजीव मानवी जीवनाचाही अविभाज्य घटक आहेत. या वन्यजीवांच्या परस्परसंबंधांविषयी, निसर्गातल्या विविध घडामोडींमध्ये असलेल्या त्यांच्या सहभागाविषयी माहिती व्हावी, त्या दृष्टीने जनजागृती व्हावी, यासाठी १९५४ सालापासून दरवर्षी भारत सरकारच्या 'नॅशनल बोर्ड ऑफ वाइल्डलाईफ' तर्फे ऑक्टोबर महिन्याचा पहिला आठवडा 'भारतीय वन्यजीव सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येतो. वनविभाग, ब्रम्हपुरी अंतर्गत येणाऱ्या दक्षिण ब्रम्हपुरी परिक्षेत्रामध्ये दिनांक ०१ ऑक्टोंबर २०२५ ते ०७ऑक्टोंबर २०२५ पर्यंत दक्षिण ब्रम्हपुरी परिक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या उपक्षेत्र व नियतक्षेत्रा मध्ये वन्यजीव सप्ताहचा कार्यक्रम पार पडला.




सदर कार्यक्रमाकरीता गावागावामध्ये जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात आले. यात वन्यप्राण्यांच्या अधिवासात होणाऱ्या मानवी घुसखोरीमुळे, वेगवेगळया प्रकल्पांमुळे वन्यप्राणी त्यांच्या अधिवासातून बाहेर पडत आहेत. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढला आहे. अधिवासाचा ऱ्हास, अवैध शिकार, विकास प्रकल्प यांमुळे वन्यप्राण्यांच्या अधिवासासह त्यांचे अस्तित्वदेखील धोक्यात आले आहे. त्यामुळे या सर्वांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने संरक्षित क्षेत्रात वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. जंगल क्षेत्रातील वन्यजीवांचा अधिवास सुरक्षित राहून त्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे, हा त्यामागचा खरा उद्देश असून तसेच १९५२ मध्ये धोक्यात असलेल्या प्रजातींच्या संवर्धनाच्या उद्देशाने वन्यजीव सप्ताहाची संकल्पना सुरू झाली. वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ सारखे कायदेही अस्तित्वात असल्याची यावेळी माहिती देण्यात आली.

तसेच गावातील जनतेला जंगला विषयीचे महत्व पटवून देण्यात आले. वन्यप्राण्यांविषयी माहिती देण्यात आली. जंगलामध्ये जात असतांना वन्यप्राण्यांपासून स्वत:चे बचाव कशा पद्धतीने करता येईल, या विषयी माहिती देण्यात आली. गांवातील शाळांमध्ये जावून मानव व वन्यजीव संघर्ष टाळण्याच्या दृष्टिकोणातून सापांविषयी माहिती देण्यात आली. सापांविषयी माहिती देण्याकरिता स्वॉब समितीचे सदस्यगण उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला ए.व्हि.सोनडवले वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) दक्षिण ब्रम्हपुरी, क्षेत्र सहाय्यक, वनरक्षक, व ईतर वनकर्मचारी, स्वॉब संस्थेचे अध्यक्ष यश कायरकर तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते.

## विनोदिनी

एका तरूणाने रॉयल एनफिल्ड बुलेट विकत घेतली आणि आपल्या मैत्रिणीला घेऊन लॉंग ड्राईव्हवर गेला... परंतु रॉयल एनफिल्ड बुलेटच्या आवाजाने त्याला मैत्रिणीचे बोलणे ऐकू येत नव्हते... त्यावर त्याने ताबडतोब रॉयल एनफिल्ड विकून ॲक्टिवा घेतली व मैत्रिणीशी लग्न करून आनंदात राहू लागला...
अशात एक वर्ष जाते-न-जाते त्याने परत ॲक्टिवा विकून रॉयल एनफिल्ड विकत घेतली व आता तो परत आनंदात राहू लागला...!!!

# नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालयाची विभागीय स्पर्धेत भरारी

## प्रतिस्पर्धी संघावर ५-० ने मात करीत मिळविले यश



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरीतील नेवजाबाई हितकारणी उच्च माध्यमिक विद्यालय म्हटलं म्हणजे कला व सांस्कृतिक क्रीडा मध्ये परंपरेनुसार आपले यश जोपासत आलेली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा जिल्हास्तरीय शालेय हाकी क्रीडा स्पर्धांमध्ये १७ वर्षे वयोगट मधील ने.हि. उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरी च्या संघाने नारायणी पब्लिक स्कूल चंद्रपूर यांचा ५-० असा पराभव करून अंतिम फेरी गाठली व सेंट मेरी पब्लिक स्कूल चा पराभव करत विभागीय स्पर्धेत प्रवेश केला.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांनी शुभेच्छा दिल्या व कौतुक केले. हॉकी संघाला शाळेचे क्रीडाशिक्षक सिंधी मेश्राम सर यांचेसह शाळेचे उपमुख्याध्यापक नाकाडे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक के.एम. नाईक सर तसेच शाळेचे पर्यवेक्षक जिभकाटे सर यांचेसह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉ. धनराज खानोरकर यांची ३६ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी निवड

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरीतील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख, प्रसिद्ध कवी, ललित लेखक, पत्रकार, झाडी बोलीचे भाष्यकार, स्तंभलेखक प्रा.डॉ. धनराज लक्ष्मण खानोरकर यांची अतिशय प्रतिष्ठेचा मानल्या जाणाऱ्या झाडी बोली साहित्य संमेलनाच्या इतिहासातील गडचिरोली जिल्ह्यातील पोर्ला येथे संपन्न होणाऱ्या ३६ व्या झाडी बोली साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. बोली महर्षी डॉ. हरिश्चंद्र बोरकरांनी झाडी बोली चळवळीच्या वर्धापनदिनी डॉ धनराज खानोरकरांच्या नावाची नुकतीच घोषणा केली.

डॉ.धनराज खानोरकरांचे मनासज्जना, मास्तर मातीचे, आई लॉकडाऊन म्हणजे काय?, ओल्या वेलीची विलांटी, सिमग्याच्या बोंबा अन् चवरीच्या



सेंगा हे काव्यसंग्रह प्रकाशित असून झाडी बोली लोकजीवन आणि लोकसंस्कृतीवरील बहुचर्चित 'संजोरी ' हा ललितग्रंथ आणि चार संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर जमा आहेत. जवळपास ३० संशोधन पेपरही त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत प्रकाशित केले आहेत. याशिवाय विविध मासिकांत, दैनिकात त्यांचे सातत्याने लेखन चालू असून ते झाडी बोलीचे अभ्यासक व भाष्यकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थी आचार्य पदवीसाठी संशोधन करीत आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला आहे.

त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्र मंडळींनी अभिनंदन केले आहे.

# महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी प्रमाणे यावर्षीसुद्धा तालुक्यातील रूई येथील ढिवर समाजाचे वतीने रामायणाचे रचियता आद्यकवि श्री महर्षी वाल्मिकी ऋषी जयंती उत्सवाची सुरुवात दि.०६ ऑक्टोबर २०२५ रोज सोमवारला सायंकाळी घटस्थापना करुन करण्यात आली.

मंगळवारला सकाळी महर्षी वाल्मिकी ऋषींचे अभिषेक करुन पुजाअर्चना करण्यात आली नंतर हळदीकुंकु, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच या कार्यक्रमाच्या निमित्याने आयोजीत माँ तुळजाभवानी महिला भजन मंडळ आरमोरी यांच्या भजनाने उपस्थित सर्व मान्यवर पाहूणे मंडळी तथा समाज बांधव मंत्रमुग्ध झाले. सायं.५-३० वा गोपालकाला व नंतर सहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन अन्नाजी ठाकरे यांचे हस्ते ज्ञान शिऊरकार सदस्य ग्रा.प.याचे अध्यक्षतेखाली पार पडले. जयंतीचे औचित्य साधून पाचगांव निवासी रामचंद्र चापले पोलीस उपनिरिक्षक शेगांव (बु.)यांचा सेवानिवृतीपर सपत्निक सत्कार ढिवर समाजाचे वतीने आला करण्यात आला. तसेच ढिवर समाजाचे नेते देवचंद ठाकरे माजी सरपंच रुई, व हरीजी बावने यांचा सत्कार ढिवर समाजाचे वतीने शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून बाबुराव डोंगरवार से.नि.शिक्षक,महादेव ठाकरे, तारांचद मेश्राम, सुखदेव भोयर, रामदास ठाकरे, पांडूरंग ठाकरे, हरिश्चद्र ठाकरे, पुरुषोत्तम ठाकरे, लव्हाजी शिऊरकार, अतुल ठाकरे व बहुसंख्येने ढिवर समाज बांधव तथा प्रेक्षक वर्ग उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचलन बाबुराव डोंगरवार यांनी केले तर आभार प्रदर्शन अजय शिऊरकार यांनी केले.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# राष्ट्रसंत म्हणजे मानवतेच्या संदेशातून राष्ट्र निर्माणाला दिशा देणारे खरे संत - आम. वडेट्टीवार

## रणमोचन येथे खंजिरी भजन स्पर्धेचा उद्घाटन कार्यक्रम

ब्रम्हपुरी /का.प्र.

गुरुदेव सेवा मंडळ रणमोचन(नवीन वस्ती) येथे



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार विजय वडेट्टीवार यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

आज समाजात संत म्हणून मिरवणारे, त्या नावाने अपार संपत्ती गोळा करून भोळ्या - भाबड्या जनतेचे शोषण करणाऱ्या स्वयंघोषित संतांची कमी नाही. मात्र आपल्या क्रांतिकारक भजनाने समाज जागृतीतून माणसाला माणसाशी जोडून देश स्वातंत्र्याची मशाल पेटविणारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे खरे राष्ट्रसंत होय. पाश्चिमात्य संस्कृतीमुळे शहरी भागातील तरुणाईला व्यसनाधीन व भरकटलेल्या अवस्थेकडे नेण्याचे काम केले. मात्र गावखेड्यात आजही राष्ट्र संतांच्या विचारांची व आपल्या बहुमूल्य संस्कृतीची जपणूक केली जात असून त्यामुळेच मानवतेची नीतिमूल्ये टिकून आहे. प्रत्येक गावाचा विकास म्हणजेच देशाचा सर्वांगीण विकास असून आपल्या ग्रामगीतेतून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामविकासाचे महत्व पटवून दिले. आमदार विजय वडेट्टीवार यांनी कार्यक्रमा प्रसंगी मत व्यक्त केले.

यावेळी खेमराज तिडके तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी ब्रम्हपुरी, सोनू नाकतोडे अध्यक्ष युवक काँग्रेस कमिटी, मोंटूभाऊ पिलारे, प्रा. डी.के. मेश्राम, अण्णाभाऊ ठाकरे, सुचित्राताई ठाकरे, सरपंच निलिमा राऊत, माजी सरपंच भारत मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य संजय प्रधान, घनश्याम मेश्राम, मंदाताई सहारे, अश्विनी दोनाडकर, जगदीश सहारे ब्रम्हपुरी, दादाजी पिलारे, धोटे बाबूसाहेब, अस्मिता पिलारे, ललित दहीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुनिल नाकतोडे तर आभार गोवर्धन दोनाडकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव व भव्य विदर्भ स्तरीय खुली खंजेरी भजन स्पर्धा यस्वीतेकरीता गुरुदेव सेवा मंडळ रणमोचन (नवीन वस्ती), युवक, महिला मंडळ व समस्त गावकरी मंडळीने मोलाचे सहकार्य केले.

## प्रारूप मतदार यादीवर आक्षेप व हरकतीस मुदतवाढ

# ब्रम्हपुरी नगर परिषद निवडणूक २०२५

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगरपरिषद ब्रह्मपुरी सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रारूप मतदार यादीवर आक्षेप व हरकती सादर करण्यासाठी यापूर्वी दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. मात्र, माननीय राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त सुधारित वेळापत्रकानुसार, आक्षेप सादर करण्याची अंतिम मुदत आता दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

त्यामुळे संबंधित प्रभागातील मतदारांनी आपली नावे प्रारूप मतदार यादीमध्ये योग्यरीत्या समाविष्ट झालेली आहेत याची खात्री करून घ्यावी. काही तक्रार, आक्षेप अथवा दुरुस्ती आवश्यक असल्यास संबंधितांनी नमुना अ किंवा नमुना ब मध्ये आपले आक्षेप नगरपरिषद कार्यालयात निश्चित मुदतीत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घेण्याचे आवाहन न.प. मुख्याधिकारी यांनी केले आहे.

आपले नाव कोणत्या प्रभागाच्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झालेले आहे याबाबत चौकशी करण्यासाठी नागरिकांनी www.mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर भेट देऊन 'Search Name in Voter List' या पर्यायाचा वापर करावा. मतदार आपल्या नावाने किंवा मतदार ओळखपत्र क्रमांकाने मतदार यादीत नाव शोधू शकतात. अशी माहिती न.प.द्वारे देण्यात आली आहे.

# एलएमबी स्कुलमध्ये पालक सभा उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दि. २७ सप्टेंबर २०२५ शनिवारला शाळेच्या सभागृहात पालक सभेचे





आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होते.

पालक सभेसाठी मोठ्या संख्येने पालकांनी उपस्थिती दर्शविली. या सभेचा मुख्य हेतू अध्ययन व अध्यापन प्रणाली पालकासमोर मांडणे व त्यांना या प्रणालीबद्दल अवगत करणे हा होता. या सभेमध्ये वर्ग ४ थी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. ही सभा दोन टप्प्यामध्ये घेण्यात आली. पालक सभेमध्ये पालकांना २०२५-२६ या वर्षातील प्रत्येक उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली.

पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रश्न शाळा समितीसमोर मांडले व आपल्या पाल्यांच्या आवश्यक बाबीबद्दल चर्चा केली. शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी थेट पालकांसोबत संवाद साधत पालकाच्या समस्याचे निराकरण करीत त्यांना मार्गदर्शन केले. अशा पध्दतीने उत्साहाच्या वातावरणात पालक सभा पार पडली.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३७००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३९५

# मारोतराव कांबळे यांना मरणोत्तर जीवनसाधना गौरव पुरस्कार

## पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांचे हस्ते गोंडवाना विद्यापीठाच्या १४ व्या वर्धापन सोहळ्यात वितरीत

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोंडवाना विद्यापीठाचा १४ वा वर्धापन दिन सोहळा दि. २ ऑक्टोंबर, २०२५ रोजी,



विजयादशमी (दसरा) सण असल्यामुळे सोमवार, दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता गोंडवाना विद्यापीठाचे नविन सांस्कृतिक सभागृह येथे संपन्न झाला. कार्यक्रमामध्ये स्व. मारोतराव कांबळे यांना मरणोत्तर जीवनसाधना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे, कुलगुरु, डॉ. प्रशान्त बोकारे, आमदार तसेच अधिसभा सदस्य डॉ. मिलिंद नरोटे, या कार्यक्रमात नागपूर येथील प्रसिध्द मेंदू विकार तज्ज्ञ, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, स्व. मारोतराव कांबळे यांचे पुत्र प्राचार्य देवेश कांबळे, चंद्रपूरचे डॉ. नंदकिशोर हरीलाल खत्री हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अधिष्ठाता आंतर विद्या शाखा प्रो. प्रगती नरखेडकर , वित्त व लेखा अधिकारी सी. ए. भास्कर पठारे , व्यवस्थापन परिषद सदस्य प्रशांत मोहिते, डॉ.रंजना लाड, गुरूदास कामडी, डॉ.संजय गोरे डॉ. लेमराज लडके, डॉ. विवेक गोर्लावार , प्रशांत दोंतुलवार , डॉ.नंदाजी सातपुते, डॉ. बी. एस.गेडाम आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल ज्येष्ठ नेते व शिक्षणतज्ज्ञ स्वर्गीय मारोतराव कांबळे यांना 'जीवन साधना गौरव पुरस्कार' मरणोत्तर प्रदान करण्यात आला. त्यांचे पुत्र प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या परिचय पत्राचे वाचन मराठीच्या विभाग प्रमुख डॉ. सविता सादमवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिल्पा अठावले यांनी तर आभार कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी केले.

**जल है तो कल है...**

# राष्ट्रसंत मानवतावादी व राष्ट्रवादी संत - प्राचार्य डॉ. शेकोकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या खंजेरीच्या माध्यमातून देशात, परदेशात भजन करुन मानवतावादी विचार पेरले. सर्वसमावेशक गुरुदेव धर्म सांगीतला. राष्ट्रहितासाठी तरुणांनाच्या मनात स्फुल्लिंग चेतविला. ग्रामगीतेतून समाज जागृती केली. ते आधुनिक मानवतावादी व राष्ट्रवादी संत होते.' असे विवेचन प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी निमित्त बोलत होते.

महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर प्रा. मेजर विनोद नरड, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. असलम शेख, डॉ. मोहन कापगते, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. योगेश ठावरी, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. रतन मेश्राम, डॉ. भास्कर लेनगुरे, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. पद्माकर वानखडे, डॉ. सुनिल चौधरी, प्रा. बालाजी दमकोंडवार, डॉ. हर्षा कानफाडे, डॉ. अरविंद मुंगोले, डॉ. मिलिंद पठाडे, डॉ. कुलजित शर्मा, डॉ. अजित खाजगीवाले, अधीक्षक संगीता ठाकरे, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, डॉ. ज्योती दुपारे, प्रा. अभिजित परकरवार, प्रा. पराते, रोशन डांगे, सुषमा राऊत, रुपेश चामलाटे, निनावे, दत्तू भागडकर इत्यादी मान्यवरांनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

संचालन व आभार प्रदर्शन डॉ. युवराज मेश्रामांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. शर्मा, डॉ. खानोरकर, प्रा. धिरज आतला, जगदिश गुरनुले, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

# ने.हि. विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा, ३८ वर्षांनी आले एकत्र

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवाजाबाई हितकारिणी विद्यालयातील १९८७ सालच्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा तब्बल ३८ वर्षानंतर स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला देश विदेशातून तब्बल ३५ विद्यार्थी जमले होते. यापैकी बरेच विद्यार्थी आज खाजगी कंपन्यांमध्ये उच्च पदावर आहेत, कोणी डॉक्टर, कोणी इंजिनियर, काही विद्यार्थी



स्वत:च्या व्यवसायात यशस्वी झाले आहेत, काही जण शिक्षकी पेशा स्वीकारून विद्यार्थी घडविण्याचे सत्कार्य करीत आहेत तर त्यातले काही मातीतून मोती पिकविणारे पोशिंदे बनले आहेत.

सर्वच विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशस्वी भवितव्यामध्ये माजी शिक्षकांचा सिंहाचा वाटा असल्याचे नमूद करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी खेळीमेळीच्या वातावरणात जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. माजी मुख्याध्यापक मराठे सर, राम दोनाडकर सर, गोडे सर, सुखदेवजी प्रधान सर, ऋषीजी राऊत, मिसार सर आणि ग्रंथपाल देवराव ठेंगरी आदींची उपस्थिती होती. सर्व विद्यार्थी यांनी शिक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. माजी शिक्षक सुखदेव प्रधान सर यांनी सुखी जीवनासाठी वेळ काढून गेट-टुगेदर व्हायलाच पाहिजे, असे मत व्यक्त केले. तसेच व्यवसाय किंवा नोकरी करणाऱ्यांनी अडचणीचा सामना करत न डगमगता त्यावर मात करत समोर जावे असे आवाहन केले त्यानंतर इतर शिक्षकांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

सूत्रसंचालन एजाज हक यांनी तर नियोजन व आभार प्रदर्शन परेश करंडे आणि प्रशांत गावतुरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी माजी विद्यार्थ्यांनी विशेष परीश्रम घेतले.

# खिस्तानंदच्या यश चौधरीची जलतरण स्पर्धेत बाजी

## राज्यस्तरीय स्पर्धेकरीता पात्र



ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी वर्धा यांचे अंतर्गत नागपूर विभाग स्तरीय जलतरण स्पर्धा नगरपरिषद जलतरण केंद्र वर्धा येथे नुकत्याच पार पडल्या.

यामध्ये स्थानिक खिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथील बारावीचा विद्यार्थी यश घनश्याम चौधरी याने १९ वर्ष वयोगटाखालील बॅकस्ट्रोक जलतरण स्पर्धेत नागपूर विभागातून दुसरा क्रमांक प्राप्त केला. त्यासोबतच बेस्ट स्ट्रोक या स्पर्धेत विभागातून तिसरा क्रमांक प्राप्त केलेला असून त्याची महाराष्ट्र राज्य स्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. तो नागपूर विभागाचं प्रतिनिधित्व करणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धा लातूर येथे पार पडणार आहे. त्याला विद्यालयातील क्रीडा शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याच्या यशाबद्दल विद्यालयाचे व्यवस्थापक फादर कुरियर, मुख्याध्यापिका सिस्टर पावना, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली, ब्रह्मपुरी तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष गोपाल भानारकर तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे कौतुक केले आहे.

# महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र



इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५७ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांनी केलेल्या कार्याचे गुणगान करताना तुकडोजी महाराज हे, संत नाही तर समाजाचे शिल्पकार होते. अध्यात्म, समाजसेवा आणि राष्ट्रभक्ती यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून दिसतो. त्यांनी 'ग्रामगीता' सारख्या ग्रंथाद्वारे ग्रामीण भारताला स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबनाचा संदेश दिला, असे मनोगत प्राचार्य डॉ सचिन दुधे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी डॉ.सुहास साकरकर डॉ. अनुप बारसागडे, प्रा. पृथ्वीराज मेश्राम, प्रा. छगन डोईजड, प्रा. सविता वसाके, प्रा. पूजा घुटके, प्रा. चेतन चौधरी, प्रा. प्राची मांडवे, प्रा. अश्विनी भुकिया तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संचालन व आभारप्रदर्शन रा.से. यो.अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे व प्राचार्य डॉ. दुधे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# ब्रम्हपुरी वि.स. क्षेत्रातील अतिवृष्टीग्रस्तांना मिळणार नुकसान भरपाई

## आम. विजय वडेट्टीवार यांच्या पाठपुराव्याला यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

यंदाचे वर्षी खरीप हंगामात सर्वत्र अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे शेतातील उभे पीक पूर्णतः उध्वस्त झाले. अशा आसमानी संकट काळात हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा विधिमंडळ पक्षनेते आ. विजयभाऊ वडेट्टीवार यांनी राज्य सरकार कडे संपूर्ण



राज्यातील शेतकरी बांधवांना भरीव आर्थिक मदत देऊन, सरसकट कर्जमाफी करण्याची मागणी केली. तसेच ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी केलेल्या आग्रही मागणीच्या पाठपुराव्याला यश आले असून ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील ब्रम्हपुरी, सावली, सिंदेवाही तालुक्यातील शेतकऱ्यांना लवकरच नुकसान भरपाई मदत मिळणार आहे.

आ. विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रात यंदाचे वर्षी झालेल्या अतिवृष्टीची गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली. व लगेच कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामा करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांची दैनावस्था बघून सदर मागणी त्यांनी शासन दरबारी रेटून धरल्याने अखेर आ. विजय वडेट्टीवार यांच्या प्रयत्नांना यश आले असून ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील ब्रम्हपुरी, सावली, सिंदेवाही या तीनही तालुक्यांचा अतिवृष्टी व नुकसानग्रस्त तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. विधिमंडळ पक्षनेते,आ विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या प्रयत्नामुळे सदर तीनही तालुक्यातील शेतकऱ्यांना लवकरच नुकसान भरपाई मदत मिळणार आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

**... QUOTES ...**

"My final words of advice to you are educate, agitate and organize; have faith in yourself."

- Dr. Babasaheb Ambedkar

**चा रो ळी**

तु खोटं खोटंच सांगितलंस
तुझं माझ्यावर प्रेम असल्याचं...
तरी मी इतका मोहरून गेलो,
खरंच नाही वाटतं प्रेम नसल्याचं...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांचा जयंती सोहळा एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये संपन्न







ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरास ज्यांच्या परिसस्पर्शाने 'शिक्षणाचे माहेरघर' म्हणून संपूर्ण विदर्भात नावलौकीक मिळाला ज्यांच्या पुण्याईमुळे ही भूमी शिक्षणाच्या ज्ञानगंगेने प्रवाहीत झाली. असे थोर व्यक्तीमत्व, कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांची जयंती नेवजाबाई भैया हितकारीणी शिक्षण संस्था ब्रम्हपुरी अंतर्गत एल. एम. बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपूरी येथे दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी स्कूलच्या प्रांगणात अतिशय मांगल्यपुर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांचा जन्म १० ऑक्टोंबर १९०६ ला भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर येथे सर्वसाधारण परिवारात झाला. त्यांनी सामाजिक क्षेत्र व शैक्षणिक क्षेत्रात अव्याहतपणे काम करून जनमानसाच्या मनात स्वत:ची ओळख निर्माण केली. कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून ने. हि. शिक्षण संस्थेचा पाया रचला. हीच संस्था संपूर्ण क्षेत्रात मोठ्या वृटवृक्षामध्ये रूपांतरीत झाली आहे. ज्यांच्या छायेत लाखो विद्यार्थी शिक्षणरूपी ज्ञानगंगा प्राशन करीत आहेत.

याच कारणास्तव दरवर्षी ने. हि. शिक्षणसंस्थेतर्फे मदनगोपालजी भैया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'संस्थापक दिन' दि. १० ऑक्टोंबर रोजी साजरा केला जातो. तळागाळातील लोकांच्या समाजसेवेसाठी केलेल्या योगदानाचा गौरव या कार्यक्रमाद्वारे केला जातो.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम आणि पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांची उपस्थिती होती. प्रसंगी कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करण्यात आला व त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.





सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.


## पं.स. सदस्य पदांकरीता आरक्षण...

(पान क्र. १ वरून)

गणांसाठी आरक्षण आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यात एकूण ०५ जि.प. गट असून यावेळी महिलांकरीता कोणताही गट आरक्षित नाही. परिणामी, महिला वर्गाच्या पदरी निराशा पडली आहे. जि.प. गटाकरीता आरक्षण घोषित करण्यात आले असून त्यामध्ये ३ गट खुल्या प्रवर्गासाठी तर उर्वरित २ गट ओबीसींकरीता राखीव ठेवण्यात आले आहे.

आरक्षण खालीलप्रमाणे – **आवळगांव-मुडझा** : सर्वसाधारण, **मेंडकी-गांगलवाडी** : सर्वसाधारण, **चौगान-खेडमक्ता** : सर्वसाधारण, **पिंपळगांव-मालडोंगरी** : ओबीसी व **नान्होरी-अऱ्हेरनवरगांव** : ओबीसी प्रवर्गाकरीता राखीव आहे.

❁❁❁❁❁❁

## ब्रम्हपुरीत एकाच रात्री २ ठिकाणी...

(पान क्र. १ वरून)

प्रमाणे गुन्हा नोंद केलेला आहे. तर दुसऱ्या घटनेमध्ये फिर्यादी सोहेल नूरखान पठाण वय ३२ वर्ष रा.पेठ वार्ड, ब्रह्मपुरी यांचे घराचे बांधकाम सुरू असून घराला दरवाजे नसल्यामुळे सदर घरात फिर्यादी सोहेल पठाण हे झोपलेले असताना अज्ञात आरोपीने घरात प्रवेश करून ३०,०००/- रुपये किमतीचा Realme GT8 मोबाई व १०,०००/- रुपये किंमतीचा IQOO कंपनीचा मोबाईल असे एकूण ४०,०००/- रुपये किमतीचे दोन मोबाईल चोरून नेले. फिर्यादीने पठाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनला भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीचा शोध घेत असताना, रेल्वे स्टेशन परिसरामध्ये एक अनोळखी संशयित इसम आढळला. त्याची विचारपूस केली असता, त्याचे नाव श्रीकांत उर्फ बोटटुट्या राजू जुनारकर वय २२ वर्ष रा. चंद्रपूर असे माहिती झाली. सदर इसम हा चंद्रपूर येथील रेकॉर्डवरील आरोपी असल्याची माहिती झाल्याने सदर आरोपीची झडती घेतली असता, त्याचेकडे मोबाईल व सोन्याचे दागिने मिळून आल्याने त्याचे कडून ६३,०००/-रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे. सदर आरोपीस ताब्यात घेऊन नमूद गुन्ह्यात अटक केली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहवा मुकेश गजबे व पोहवा अजय कटाईत हे करीत आहेत.

## ब्रम्हपुरी उपजिल्हा रुग्णालयात २७५ रुग्णांची तपासणी



ब्रह्मपुरी/का.प्र.

जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर, महात्मे नेत्र रुग्णालय नागपूर, समता फाउंडेशन मुंबई तसेच उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी यांचे संयुक्त विद्यमाने वैद्यकीय अधीक्षक डॉ. खंडाळे यांचे मार्गदर्शनाखाली दि. १३ ऑक्टोबर २०२५ ला उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथे नेत्र शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २७५ नेत्र रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६९ मोतीबिंदू रुग्णांची नेत्र शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. यापैकी एकूण ५२ मोतीबिंदू रुग्ण महात्मे नेत्र रुग्णालय नागपूर येथे पाठविण्यात आले. तसेच एकूण १७ मोतीबिंदू रुग्ण जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे नेत्र शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. या शिबिरात सर्व नेत्र रुग्णांची तपासणी नेत्र चिकित्सा अधिकारी वाय.आर. रामटेके यांनी केली. नेत्र शस्त्रक्रिया पूर्व तपासणी उपजिल्हा रुग्णालय ब्रह्मपुरी येथील फिजिशियन डॉ. किशोर जिवने व डॉ. ओमप्रकाश ढोंगे यांनी केली. यावेळी समता फाउंडेशन चे आरोग्य अधिकारी आकाश निकुरे प्रामुख्याने उपस्थित होते.


बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404